दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com | RNI No.MAHMAR/2019/79184
▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ३७ वा ▶ मंगळवार दि.१२ डिसेंबर २०२३ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे :६

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे
पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### गुरांची वाहतूक; दोघांविरूद्ध गुन्हा

**नरडाणा ।** गुरांची निर्दयपणे वाहतूक करणार्या पिक-अप वाहनावर नरडाणा पोलिसांनी कारवाई केली. चालकासह दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला. मुंबई-आग्रा महामार्गावरील हॉटेल बाबाजी समोर पोलिसांनी पिक-अप (एमएच २८, बीबी १९८७) वाहनाला पकडले. वाहनाची तपासणी केली असता त्यात गोवंश जातीच्या चार गोर्यांना निर्दयपणे कोंबून त्यांची वाहतूक केली जात असल्याचे आढळले.

### बसस्थानकातून दागिने लंपास

**धुळे ।** शहरातील मध्यवर्ती बसस्थानकात चोरट्याने महिलेचे ८५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने लंपास केले. बाजारभावानुसार त्याची किंमत पाच लाखांवर आहे. वंदना सुनील अमृतकर बॅगेतील दागिन्यांची पर्स चोरट्याने चोरून नेली. एकूण ८६ हजार ८०० रुपयांचा ऐवज होता. बाजारभावानुसार आज त्या दागिन्यांची किंमत पाच लाखांवर आहे.

### प्रवासा दरम्यान सोनपोत लांबविली

**धुळे ।** एसटी बसमध्ये प्रवासादरम्यान चोरट्यांनी महिलेची १२ ग्रॅमची सोनपोत लंपास केली. कौठळ (ता. धुळे) गावातील अनिता प्रकाश सूर्यवंशी या चिमठाणे ते हातनूर फाट्यादरम्यान बसने प्रवास केला. त्यादरम्यान त्यांच्या बॅगेतील पाकिटात ठेवलेली १२ ग्रॅमची सोनपोत चोरट्याने चोरून नेली. तिची किंमत ३६ हजार रुपये आकारण्यात आली. याबाबत शिंदखेडा पोलिस ठाण्यात नोंद झाली.

## सत्यशोधक मोर्चाचा धुळ्यात मुक्काम
# डिसेंबर २३ ला मुंबईत धडकणार

### १७ दिवसात ४३२ किलोमीटरची करणार पायपीट

**धुळे । प्रतिनिधी**

आदिवासी शेतकर्‍यांच्या प्रलंबित मागण्यांसह जंगलग्रस्तांचे प्रश्न सोडवावेत, यासाठी सत्यशोधक शेतकरी सभा आणि सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेतर्फे नंदुरबारहून निघालेला पायी बिर्हाड महामोर्चा काल धुळ्यात आला. आता मुंबईकडे कूच करणार आहे.

मोर्चा १७ दिवस ४३२ किलोमीटर पायपीट करीत मंत्रालयावर धडकणार आहे. मोर्चा नंदुरबार, साक्रीमार्गे धुळे, मालेगाव, नाशिक, मुंबई असा जाणार असून २३ डिसेंबर रोजी मुंबईत पोहोचेल. सरकारने योग्य निर्णय न घेता महामोर्चा अडवल्यास त्याच ठिकाणी जेलभरो सत्याग्रह करण्यात येईल.असा इशारा मोर्चेकर्‍यांनी दिला आहे. मोर्चाला रामसिंग गावीत, करणसिंग कोकणी, किशोर ढमाले, सुभाष काकुस्ते हे मार्गदर्शन करत आहेत. मालेगाव येथे १३ डिसेंबर रोजी, १७ डिसेंबर रोजी नाशिक येथील आदिवासी विकास भवनाजवळ मोर्चा पोहचणार आहे. त्या ठिकाणी जाहीर सभा होईल. सभेला महाराष्ट्रातील विविध शेतकरी संघटन आणि डाव्या व आंबेडकरवादी पक्षांचे नेते मार्गदर्शन करतील.अशी माहिती दिलीप गावित, मन्साराम पवार, विक्रम गावित यांनी दिली आहे. मोर्चेकर्यांच्या मागण्यांमध्ये नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींची शेती नष्ट करणार्‍या गुंड मेंढपाळांवर अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हे दाखल करावेत, पेसा कायदा व वनहक्क कायदा यावर आक्रमण करणारा वनसंरक्षण कायदा (दुरुस्त) २०२३ त्वरित रद्द करावा, मणिपूरमधील आदिवासींवर अत्याचार करणार्‍यांना कठोर शिक्षा करावी, बनावट आदिवासी हटवावेत आणि आदिवासी यादीतली घुसखोरी थांबवावी, केंद्र शासनाने जनविरोधी वीज कायदा मागे घेऊन सर्व शेतीमालाला हमी भाव देणारा कायदा करावा, शेतकरी आंदोलनातील हुतात्म्यांना जाहीर नुकसान भरपाई द्यावी, शेतकर्‍यांना हमीभाव व कष्टकर्‍यांना अनुदान देऊन अन्न सुरक्षा कायद्याची (रेशन) अंमलबजावणी करावी, नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण रद्द करा आदींचा समावेश आहे.



**दावेदारांना हक्काचे ७/१२ द्या**

**वनहक्क कायदा २००६ ची अंमलबजावणी करून दावेदारांना हक्काचे ७/१२ द्या. स्थळपहाणी व जीपीएस मोजणी करा. आदिवासी विरोधी वनकायदा २०२३ रद्द करा. आदिवासींना वनवासी म्हणणे कायद्याने गुन्हा ठरवा. यामागण्यांसाठी हा पायी बिऱ्हाड महामोर्चा निघालेला आहे.**

### दहा हजाराहून अधिक मोर्चेकरी सहभागी

**धुळे,नाशिक,नंदुरबारसह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील १० हजारहून अधिक शेतकरी, शेतमजुर या महामोर्चात सहभागी शेकडांच्या संख्येने सहभागी झाले होते. हा मोर्चा नंदुरबार, साक्री,धुळे,मालेगाव,नाशिक, मुंबई असा ४३२ कि.मी.पायी प्रवास करीत सतरा दिवसांनी २३ डिसेंबर रोजी मुंबईत पोहोचणार असल्याचे समजते.**

# सतीश शेलारांच्या खुनाची मित्रानेच दिली सुपारी

### आर्थिक व्यवहारातून वाद; मुख्य सूत्रधार ताब्यात

**धुळे । प्रतिनिधी**



शहरातील मिल परिसरातील प्रभाग क्र.१७ मधील भाजपाचे नगरसेवक अमोल मासुळे यांचे मामा तथा द्वारकाधिश प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष रविंद्रबापूजी शेलार यांचे बंधू सतीश शेलार यांची ठाण्यात निघृण हत्या करण्यात आल्याने धुळ्यात प्रचंड खळबळ उडाली आहे.

दरम्यान, सतीश शेलार यांच्या हत्येच्या प्रकरणात मित्राने मारण्याची सुपारी दिली होती. हत्येच्यावेळी हा टॅक्स कन्सल्टंट मित्र सतीश यांच्या सोबत होता. आपल्यावर संशय येवू नये म्हणून त्याने स्वतःवरही हल्ला करवून घेतला. दरम्यान, पोलिसांनी टॅक्स कन्स्लटंट भूषण पाटीलला ताब्यात घेतले असून दीड कोटी रुपयांच्या व्यवहारातून सतीश यांच्या हत्येची सुपारी दिल्याचे त्याने पोलिसांसमोर कबुल केले आहे. धुळ्यातील द्वारकाधिश प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र बापूजी शेलार यांचे बंधु सतीश शेलार (पाटील) हे बांधकाम क्षेत्रात कार्यरत होते. गेल्या दीड वर्षांपासून ते ठाण्यात राहत होते. बांधकाम क्षेत्रात त्यांनी स्वतःचा एक दबदबा निर्माण केला होता. ठाण्याच्या वर्तकनगर भागात राहणारे सतीश एकनाथ पाटील आणि त्यांचा मित्र भूषण बाळू पाटील हे दोघे शनिवारी संध्याकाळी आनंद नगर कासारवडवली सिग्नलवर सतीश यांच्या चारचाकीत बोलत बसले असताना दोन सशस्त्र हल्लेखोर आले. दोघां हल्लेखोरांनी तलवारीने सतीश याच्यावर हल्ला करत सपासप वार केले. या हल्ल्यात सतीश याचा मृत्यू झाला. तर भूषण हे जखमी झाले त्यांना तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कासारवडवली पोलिसांचे पथक आणि ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.पोलिसांनी भूषण याची कसून चौकशी केली असता, त्याने दीड कोटी रुपयांच्या आर्थिक व्यवहारातून सतीश यांची हत्येची सुपारी दिल्याचे कबूल केले.हत्येच्या सुपारीचा संशय येवू नये म्हणून भूषण पाटीलने स्वतः वर वार करुन घेतल्याची माहिती पोलिसात तपासात पुढे आली आहे. दरम्यान सतीश शेलार (पाटील) यांच्या हत्येची वृत्त धुळ्यात येवून धडकताच शेलार आणि मासुळे कुटूंबियांकडे आप्त मित्रगणांनी धाव घेतली. संपूर्ण मिल परिसरावर शोककळा पसरली. शनिवारी रात्री सतीश यांची हत्या झाली होती. रविवारी संध्याकाळी त्यांचे पार्थिव धुळ्यात आणण्यात आले.

## कलम ३७० हटवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय योग्य; सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

**दिल्ली । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालया आज (११ डिसेंबर) जम्मू आणि काश्मिरमधील कलम ३७० च्या मुद्द्यावर सुनावणी पार पडली. आजच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठानं ऐतिहासिक निर्णय दिला. सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकानं जम्मू काश्मिरमधून कलम ३७० हटवण्याचा घेतलेला निर्णय योग्य असल्याचं म्हटलं आहे.

याआधी सर्वोच्च न्यायालयानं ५ सप्टेंबर रोजी १६ दिवसांच्या चर्चेनंतर यावर निर्णय राखून ठेवला होता. भारताचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती संजय किशन कौल, न्यायमूर्ती संजीव खन्ना, बीआर गवई आणि न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने हा निर्णय दिला आहे. कोर्टात ॲटर्नी जनरल आर वेंकटरामानी, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, ज्येष्ठ वकील हरीश साळवे, राकेश द्विवेदी, व्ही गिरी आणि इतरांनी कलम ३७० रद्द करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाची बाजू मांडली. त्याचवेळी याचिकाकर्त्यांच्या वतीनं कपिल सिब्बल, गोपाल सुब्रमण्यम, राजीव धवन, जफर शाह, दुष्यंत दवे आणि इतर ज्येष्ठ वकिलांनी युक्तिवाद केला. जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवणं घटनात्मकदृष्ट्या वैध असल्याचं सर्वोच्च न्यायालयानं म्हटले आहे. अशाप्रकारे केंद्र सरकारनं घेतलेला निर्णय पूर्णपणे योग्य असल्याचं सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

## ड्रग्ज कारखाना उभारणीसह विक्रीत हरिशपंतचा सहभाग

**नाशिक ।** 'एमडी' (मेफड्रोन) च्या उत्पादनासाठी शिंदे गावात कारखान्याच्या उभारणीत मुंबईतील संशयित हरिशपंतचा सहभाग चौकशीतून उघड झाला आहे. पोलिस कोठडीत असलेल्या मुख्य सूत्रधार ललित पाटील (पानपाटील) याच्या चौकशीत आणखी विविध खुलासे होत असून, रॅकेट उद्ध्वस्त करण्यासह दोषींवर कारवाईसाठी महत्त्वपूर्ण माहिती पोलिसांना मिळत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

पोलिस कोठडीतील सर्वच संशयितांची पोलिसांकडून कसून चौकशी केली जात आहे. या प्रकरणात आत्तापर्यंत पोलिसांनी ललितसह त्याचा भाऊ भूषण पाटील (पानपाटील), अभिषेक बलकवडे, रोहित चौधरी, हरिशपंत, शिवा शिंदे, झिशान शेख यांना गजाआड केले आहे.

## धुळ्यात काँग्रेसचे खा.धीरज साहू यांचा पुतळा जाळून निषेध



**धुळे । प्रतिनिधी**

काँग्रेसचे खासदार धीरज साहू यांच्या घरी ईडी ने टाकलेल्या छाप्यात ३०० कोटींहून अधिक रोकड सापडली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नोटबंदी केल्यानंतर सर्वाधिक काळा पैसा काँग्रेस नेत्यांकडे सापडला आहे. काळे धन जमविणार्यांना पंतप्रधान मोदी स्वस्थ बसू देणार नाही. काँग्रेसचा ७० वर्षांचा भ्रष्टाचार जनतेसमोर उघड होत आहे, असे म्हणत भाजपा धुळे महानगरतर्फे शहरातील विविध मंडळांच्या वतीने खा.धीरज साहू यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. तसेच काळा पैसा जमविल्याबद्दल खा.साहू यांचा धिक्कार करण्यात आला. शहरातील महाराणा प्रताप चौक, झाशी राणी चौक, सुभाष चौक आदी ठिकाणी खा.धीरज साहू यांच्याविरोधात हे निषेध आंदोलन करण्यात आले.

भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्राताई वाघ यांच्या आदेशाने करण्यात आलेल्या या आंदोलनात भाजपा महिला मोर्चाच्या पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. यावेळी काही ठिकाणी पुतळ्यास चाबूक मार, चपला मारो आंदोलन करण्यात आले, तर काही ठिकाणी पुतळा जाळून निषेध करण्यात आला. या आंदोलनात महापौर प्रतिभा चौधरी, माजी महापौर जयश्री अहिरराव, माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर, भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष वैशाली शिरसाठ, मोहिनी धात्रक, नेहा अहिरराव, मिनल अग्रवाल, संगीता राजपूत, आरती पवार, आरती महाले, संगीता पोतदार, उर्मिला पाटील, सुवर्णा पाटील, आशा चौधरी, वैशाली पाचपुते, उमा कोळवले, दिपाली खडगे, आशा खडगे, वैभवी दुसाने, पुनम सिंह, सुवर्णा बडगुजर, पुष्पा बोरसे, मोहित घाटगे, उर्मिला पाटील, प्रमिला जाधव, वंदना सातपूते, सुनिता सोनार आदी महिला पदाधिकारी तसेच भाजपाचे ज्येष्ठ नेते हिरामण गवळी, यशवंत येवलेकर, ॲड.सचिन जाधव, आकाश परदेशी आदी पदाधिकारीही सहभागी झाले होते.

## मालमत्तेच्या वादातून लहान भावाने केली मोठ्या भावाची हत्या

**नाशिक ।** उपनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या रामदास स्वामीनगर येथील मानस अपार्टमेंट बिल्डिंग नंबर एकमध्ये मालमत्तेच्या वादातून दोन भावांमध्ये वाद निर्माण झाला. त्यानंतर या वादाचे रुपांतर हाणामारीत होऊन संतप्त झालेल्या लहान भावाने मोठ्या भावाला बेदम मारहाण केली व धारदार वस्तूने आणि दगडी वरवंटा टाकून मोठ्या भावाचा खून केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी संशयित आरोपीला अटक केली असून घटनेप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्या दोघांचे फ्लॅट विक्रीच्या कारणावरून आपसात भांडण झाले. त्यानंतर आज सोमवार (दि.११) रोजी सकाळी अकरा वाजता मयंक याच्या लहान भावाने काहीतरी लोखंडी टोकदार वस्तूने व दगडी वरवंट्याने मारून मयंक याची हत्या केली.

## पगारवाढीसाठी ठेकेदार कंपनीने मागितली वेळ

### भाजपा ओबीसी मोर्चाची आक्रमक भूमिका

**धुळे । प्रतिनिधी**

गेल्या दहा-बारा वर्षांपासून कार्यरत असलेल्या आरोग्य मित्रांना ११ हजार रुपये तुटपुंज्या पगारावर काम करावे लागत आहे. त्यामुळे आरोग्य मित्रांनी गेल्या दोन दिवसांपासून उपोषणाचे हत्यार उपसले आहे. मात्र, या कर्मचार्यांचा पगार न वाढविता ठेकेदार कंपनीने त्यांचे आंदोलन चिरडण्यासाठी आजपासून परस्पर मुलाखतीचे आयोजन केले होते. याची माहिती मिळताच भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष दिनेश बागुल, युवक जिल्हाध्यक्ष विक्की

परदेशी यांच्यासह पदाधिकार्यांनी देवपुरातील महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेच्या जिल्हा कार्यालयात




धडक दिली. तसेच सुरु असलेल्या मुलाखती उधळून लावल्या. यामुळे ठेकेदार कंपनीच्या मॅनेजरनेही तातडीने भरती रद्द करत उपोषणाला बसलेल्या आरोग्य मित्रांनाच कामावर घेण्यात येईल, असे आश्वासीत केले. तर आरोग्य मित्रांना शासननियमाप्रमाणे २६ हजार ५०० रुपये पगार मिळालाच पाहीजे, अशी भुमिका भाजपा ओबीसी मोर्चाने मांडली. यावर कंपनीच्या मॅनेजरने २४ तासांची अर्थात मुदत मागितली आहे.

## विज वितरण कंपनीच्या भोंगळ कारभाराविरोधात आंदोलन छेडणार

### आर्वी ग्रामस्थांनी दिला इशारा

**धुळे । प्रतिनिधी**

तालुक्यातील आर्वी येथे विज वितरण कंपनीचा भोंगळ कारभाराविरोधात जि.प.सदस्य किशोर आल्लोर, पं.स.सदस्य जिभाऊ शेंनगे यांच्यासह गावकऱ्यांनी अभियंता दिनेश ठाकूर यांच्यासह कर्मचाऱ्यांना सोबत घेवून आर्वी गटात डीपी परिसरात पाहणी केली.

गेल्या आठ दिवसापासून आर्वी गटातील पुरमेपाडा येथील चुडामनगर या ठिकाणी ग्रामस्थसह शेतकऱ्यांना पाणी नसल्याने संताप व्यक्त केला. त्यात डीपीची वायर शॉर्ट झालेले डीपीला करंट लागत आहे. परिस्थितीत सुधारणा व्हावी. अन्नथा जन आंदोलन छेडू असा इशारा जिल्हा परिषद सदस्य किशोर आल्लोर,



पंचायत समिती सदस्य जिभाऊ शेंडगे,पुरमेपाडा येथील सतिष जाधव, नाना खैरनार, सुनील सोनार, माधव जाधव, जितेंद्र जाधव, कैलास मोरे, आधार मोरे, बळीराम सोनवणे, दादाभाऊ सोनवणे,लक्ष्मण सोनवणे, शिवदास सोनवणे, मनोज जाधव, धर्मा सोनवणे, राजेंद्र जाधव, रावसाहेब जाधव यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

## शेतमाल, साहित्य चोरांची टोळी जेरबंद

**नंदुरबार । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून शेतमाल, साहित्य चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. त्याची दखल घेत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शहादा तालुक्यातून शेतकऱ्यांचा शेतमाल, साहित्य चोरी करणारी टोळी जेरबंद केली आहे. त्यांच्याकडून दोन लाख ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्या चार गुन्ह्यांची उकल झाली आहे, अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक पी. आर. पाटील यांनी दिली.

जिल्हा पोलिस अधीक्षक पाटील यांना मिळालेल्या माहितीनुसार मागील काही दिवसांत शहादा व सारंगखेडा पोलिस ठाणे हद्दीत कापूस, सोयाबीन, तांदूळ चोरी करणारे आरोपी बोरद (ता. तळोदा ) येथील आहेत. तसेच चोरी केलेला कापूस, सोयाबीन व तांदूळ संशयित आरोपींनी त्यांच्यातील एका साथीदाराच्या घराच्या मागे पोत्यांमध्ये लपवून ठेवलेला असल्याची खबर होती. जिल्हा पोलिस अधीक्षकांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार खेडकर यांना माहिती देऊन कारवाईचे आदेश दिले.

## देशाच्या अर्थव्यवस्थेत नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांची नोंद : पवार

**नाशिक । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने केलेल्या कांदा निर्यात बंदीच्या विरोधात शेतकरी संतप्त झाला आहे. शेतकऱ्यांच्या याच भावना लक्षात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार कांदाप्रश्नी स्वतः रस्त्यावर उतरले आहेत. शरद पवारांच्या उपस्थितीत मुंबई-आग्रा महामार्गावरील चांदवड चौफुलीवर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्यानंतर पवारांनी याठिकाणी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना पवार म्हणाले की, देशाच्या अर्थव्यवस्थेत नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांची नोंद आहे. परंतु, सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या कष्टाला किंमत नाही. केंद्र सरकारला शेतकऱ्यांबाबत कुठलीही आस्था नाही. ताटात कांदा मिळतो त्यासाठी शेतकरी कष्ट करतात. मात्र, कांदा निर्यात बंदीमुळे शेतकरी हवालदिल झाला असून सरकारने तात्काळ कांद्यावरील निर्यातबंदी उठवली पाहिजे, असे शरद पवार यांनी म्हटले. पवार पुढे म्हणाले की, सध्याचे सरकार शेतकऱ्यांचे योग्य धोरण आखणारे नाही. त्यामुळे रस्ता रोको केल्याशिवाय सरकारला कळणार नाही. तसेच निर्णय घेतांना सरकारकडून शेतकरी हिताचा विचार केला जात नाही. त्यामुळे जर शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळाला तर आंदोलनाची गरज पडणार नाही, असेही शरद पवारांनी सांगितले.

दरम्यान, नाशिक जिल्ह्यासह राज्यातील इतर भागातील शेतकरी आधीच अवकाळी आणि दुष्काळाचा सामना करत असताना आता केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी करून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. त्यामुळे आज शरद पवार यांच्या उपस्थितीत रास्ता रोको करण्यात आला. या आंदोलनात राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कोंडाजी मामा आव्हाड, गोकुळ पिंगळे, शहराध्यक्ष गजानन शेलार, श्रीराम शेटे, माजी आमदार उत्तम बाबा भालेराव, माजी आमदार शिरीष कुमार कोतवाल ,शिवसेना जिल्हाध्यक्ष नितीन आहेर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तुषार शेवाळे यांच्यासह आदी नेते उपस्थित होते.




### रस्त्यावर आल्याशिवाय दिल्लीला कळत नाही

**सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या कष्टाला किंमत मिळत नाही. आम्हाला रस्त्यावर येण्याची हौस नाही, पण, रस्त्यावर आल्याशिवाय दिल्लीला कळत नाही असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. तसेच कांदा निर्यात बंदी करून शेतकऱ्यांची चेष्टा करण्यात येत असल्याचेही पवारांनी म्हटले आहे.**

## जुगार खेळणाऱ्या दहा जणांवर निजामपूर पोलिसांची कारवाई

**धुळे । प्रतिनिधी**

छडवेल (ता. साक्री) शिवारात जुगार खेळणाऱ्या दहा जणांवर निजामपुर पोलिसांनी कारवाई केली त्यांच्याविरुद्ध निजामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून ६० हजारांवर मुद्देमाल जप्त केला.

संशयित काल (ता. १०) सायंकाळी सहाच्या सुमारास छडवेल आमखेल रस्त्या जवळ एस. के. बियर बार शॉपसमोर घरात मांग पत्ती जुगार खेळत आहेत, याबाबत माहिती मिळाल्याने पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे, हवालदार सुनील आहिरे, व दोन पंच यांनी छापा टाकून कारवाई केली. त्यावेळी संशयित जुगार खेळताना मिळाले. त्यांच्याकडून ६२ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. हवालदार सुनील अरुण अहिरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार घनश्याम चंद्रशेखर बेडसे, दिनेश दिलीप बेडसे,-कमलेश रमेश देसले, हेमराज नवल बेडसे, सागर प्रकाश कोळी, समाधान निंबा सपकाळ, प्रवीण गोरख आहिराव, प्रल्हाद वामन भामरे, कृष्णा सुभाष सोनार (सर्व रा. छडवेल कोरडे ता. साक्री) आरोपींविरुद्ध निजामपूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला.

## मोईत्रांची गच्छन्ती

बडे उद्योग आपले हितसंबंध रेटण्यासाठी राजकारण्यांचा वापर करून घेत असतात. ते बर्याचदा सिद्ध होत नाही. मोईत्रा यांच्या हकालपट्टीविरुद्ध ओरडा करण्यापेक्षा त्यांचे निर्दोषित्व विरोधकांनी सिद्ध करावे. लोकसभेच्या सदस्या, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या महुआ मोईत्रा यांची सभागृहातून हकालपट्टी करण्यात आली आहे. सभागृहात प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेतल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. त्या आरोपाच्या चौकशीनंतर त्या दोषी असल्याचे संसदेच्या नीतिमत्ता समितीचे (एथिक्स कमिटी) मत झाल्याने समितीने शिक्षेदाखल त्यांची सभागृहातून त्वरित हकालपट्टी करण्याची शिफारस केली होती. महुआ मोईत्रा यांच्या अनैतिक वर्तनाबद्दल त्यांची सभागृहातून हकालपट्टी करण्यात यावी अशा आशयाचा ठराव संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी मांडला, तो संमत होणे हा उपचार होता, तो झाला आणि मोईत्रा यांना सभागृहाबाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. त्या आधी सभागृहात तापलेल्या वातावरणात बरीच चर्चा झाली. मोईत्रा यांना बोलू न दिल्याचा आरोप झाला. काही कायदेशीर मुद्दे उपस्थित करण्यात आले; पण सभागृहाची परंपरा, नियम याकडे सभापतींनी बोट दाखवले. मोईत्रा यांच्या हकालपट्टीचा निर्णय येताच अपेक्षेप्रमाणे राजकारण सुरु झाले. तृणमूल काँग्रेस हा पक्ष 'इंडिया' आघाडीचा घटक पक्ष आहे. त्यामुळे या आघाडीने मोईत्रा यांना पाठिंबा व्यक्त केला. मोईत्रा यांच्या पक्षश्रेष्ठ ममता बॅनर्जी यांनी त्यांच्या सवयीनुसार भाजपला आव्हान दिले; पण मुख्य मुद्दा दुर्लक्षित राहिला. महुआ मोईत्रा यांच्याविरुद्ध लोकसभेचे एक सदस्य निशिकांत दुबे यांनी तक्रार केली होती. ते भाजपचे आहेत हा मुद्दा येथे गौण आहे. महुआ मोईत्रा यांच्या वर्तनाचा मुद्दा महत्त्वाचा आहे. दुबईत राहणारे उद्योगपती दर्शन हिरानंदानी यांच्याकडून मोईत्रा यांनी सभागृहात प्रश्न विचारण्यासाठी पैसे घेतल्याचा आरोप साधा नाही. सध्या चर्चेत असलेले उद्योगपती गौतम अदानी हे दर्शन हिरानंदानी यांचे व्यावसायिक प्रतिस्पर्धी आहेत. अदानी यांना अडचणीत आणणारे प्रश्न विचारण्यासाठी ही लाच होती. आपल्याला अनुकूल प्रश्न विचारण्यासाठी हिरानंदानी यांनी मोईत्रा यांना अनेक महागड्या भेटी दिल्याचाही आरोप आहे. गेली काही वर्षे विरोधी पक्ष अदानी यांना टीकेचे लक्ष्य करत आहे. ते लक्षात घेऊन हिरानंदानी यांनी मोईत्रा यांच्यामार्फत अदानी यांना अडचणीत आणणारे प्रश्न उपस्थित केले असा आरोपांचा रोख आहे. बडे उद्योग आणि राजकीय नेते, विशेषत: सत्तेतील नेते यांचे संबंध जगभर कायम चर्चेत असतात. भांडवलशाही देशांत हे प्रकर्षाने दिसते. मोठे उद्योग व राजकारण यांची ही काळी बाजू आहे. नरेंद्र मोदी गुजरातच्या मुख्यमंत्रिपदी आल्यानंतर अदानी यांची प्रगती वेगाने झाली, या योगायोगावरही सवाल उपस्थित झाले आहेतच. मात्र त्यांचा संबंध प्रस्थापित करता आलेला नाही. मोईत्रा यांनी हिरानंदानी यांच्याकडून पैसे घेतल्याचे अजून सिद्ध झालेले नाही. मात्र लोकसभेच्या सदस्या या नात्याने सभागृहाच्या 'पोर्टल'ला 'लॉग इन' करण्याचे तपशील हिरानंदानी यांना आपण दिल्याचे मोईत्रा यांनी कबूल केले आहे. ही गुप्त माहिती त्रयस्थाला देण्याचे कारण काय? हा प्रश्न येथे महत्त्वाचा ठरला. नियम व संकेतांचा भंग करणारे त्यांचे हे वर्तन आहे. यामुळे सभागृहाचा अवमान केल्याचा आरोप त्यांच्यावर झाला. यापूर्वीही अनेक खासदारांनी कोणाचे हितसंबंध जपण्यासाठी आपल्या पदाचा दुरुपयोग केला असेलही. २००५ मध्ये असे प्रकरण उघडकीस आले तेव्हा ११ सदस्यांची हकालपट्टी करण्यात आली होती, त्याची नोंद आहे. नीतिमत्ता समितीच्या बैठकीत मोईत्रा यांनी आपली बाजू का मांडली नाही? आरोप करणार्याची नियमानुसार उलट तपासणी त्यांनी का घेतली नाही? यांची उत्तरे त्यांनी देणे गरजेचे आहे. विरोधकांचे खच्चीकरण करण्यासाठी मोदी सरकार प्राप्तिकर खाते, अंमलबजावणी संचालनालय यांचा वापर करत असल्याचे अनेकदा दिसले आहे; पण या प्रकरणात मोईत्रा स्वच्छ असल्याचेही सिद्ध झालेले नाही. महाभारताचा दाखला देत आपण अनेक वर्षे लढू असे आकांड तांडव त्यांनी व विरोधी पक्षांनी करण्याचीही गरज नाही. सर्व राजकीय पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी आपले वागणे स्वच्छ ठेवले पाहिजे हा या गच्छंतीचा संदेश आहे.

# शालेय पोषण आहारात अंडी देणे योग्य की अयोग्य !

इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय पोषण आहारात अंड्यापासून बनवलेल्या पदार्थांचा समावेश करण्याचा राज्यसरकारने घेतलेला निर्णय आता वादाच्या भोवर्‍यात सापडला आहे. शाकाहारी चळवळीसह, पुरोहित संघ, बजरंग दल, ब्राह्मण संघटना, जैन-मारवाडी संघटना यांनी हा निर्णय मागे घेण्याची मागणी केली आहे. शाळेत अनेक जातीधर्माची मुले एकत्रितपणे शिकत असतात. ज्यामध्ये जैन, मारवाडी, महानुभावी पंथीय, ब्राह्मणही असतात. वारकरी संप्रदाय राज्यात खेडोपाडी पसरला आहे. वारकरी सांप्रदायातील मंडळीही मांसाहार ग्रहण करत नाहीत. शिवाय अनेक जण असेही आहेत जे कोणत्या संप्रदायाशी निगडित नसले, तरी मांसाहाराचे दुष्परिणाम लक्षात आल्याने त्यांनी मांसाहार त्यागला आहे. विद्यार्थ्यांचे पालक मांसाहार ग्रहण करत नाहीत त्यामुळे आपल्या मुलांनाही ते देत नाहीत. पोषण आहारातील अंड्यांपासून बनवलेले पदार्थ घेण्याची विद्यार्थ्यांना सक्ती करण्यात आलेली नसली, तरी भोवतालचे विद्यार्थी हे पदार्थ चवीने खात असल्याचे पाहून मांसाहार न करणार्‍या बालवयातील विद्यार्थ्यांनाही ते खाण्याची इच्छा निर्माण होऊ शकते. ही मुले घरी पालकांना अंड्याचे पदार्थ बनवण्यासाठी हट्ट करू शकतात.



ज्यामुळे पालकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागेल. या सर्व बाबी लक्षात घेऊन अंड्यापासून बनवलेले पदार्थ शालेय पोषण आहारामध्ये देऊच नयेत याबाबत सदर संघटना आग्रही आहेत.

अंड्यामध्ये 'डी' जीवनसत्व असल्याने मुलांची हाडे मजबूत होण्यास साहाय्य होईल, विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती आणि रोगप्रतिकारक शक्ती अंड्यांमुळे वाढू शकते, अंड्यामध्ये लोह असल्याने मुलांच्या वाढीसाठी ते उपयुक्त असल्याचे सांगितले जाते. अंड्यांच्या नियमित सेवनामुळे अनेक लाभ होत असले, तरी हे सर्व घटक अन्य शाकाहारी पदार्थ, फळे आणि पालेभाज्यांतून मुबलक प्रमाणात मिळत असल्याने मुलांना अंडी खाऊ घालण्याचा अट्टाहास निरर्थक आहे. आजमितीला शहरासारख्या ठिकाणी प्रतिदिन मोठ्या प्रमाणात अंडी विक्रीसाठी येत असतात. ही अंडी ज्या कुकूटपालन केंद्रांतून येतात त्यापैकी अनेकांची अवस्था अत्यंत बिकट असते. त्या ठिकाणी कोंबड्यांना हार्मोन्स वाढणवणारे इंजेक्शन दिले जातात. कोंबड्यांची अनैसर्गिक पद्धतीने वाढ केली जाते. त्यांच्या आरोग्यापेक्षा त्या अधिकाधीक अंडी कशा देतील यासाठी त्यांना औषधे दिली जातात. यातून कोंबड्यांनी दिलेली अंडी मुलांसाठी खरंच आरोग्यदायी असतील का याबाबतही विरोध करणार्‍या संघटनानी प्रश्न उपस्थित केला आहे. अंडी सेवनाचे जसे लाभ आहेत तशी हानीही आहे. अंड्याच्या पांढर्‍या भागाचे सेवन केल्याने त्वचेवर पुरळ, सूज येऊन त्वचा लालसर होणे अतिसार, खाज सुटणे इत्यादी समस्या उद्भवू शकतात त्यामुळे ज्यांना ऍलर्जीची समस्या आहे अशांना डॉक्टर अंडे न खाण्याचा सल्ला देतात. अंड्यातील याच पांढर्‍या भागामुळे मूत्रपिंड शुद्धीकरणास अडथळा निर्माण होऊ शकतो त्यामुळे किडनीचे विकार असणार्‍यांनाही अंडी खाण्यास मनाई केली जाते. अंड्याच्या पिवळ्या भागात कोलेस्टेरॉल आणि चरबीचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे हृदयाचे आजार असणार्‍यांना अंडी अधिक प्रमाणात न खाण्याचा सल्ला दिला जातो. मांसाहारातून प्रथिने मिळत असली तरी अधिक मांसाहाराच्या सेवनामुळे हाडे कमकुवत होतात हे प्रयोगाअंती सिद्ध झाले आहे. त्या तुलनेत शाकाहारातून मिळणारी प्रथिने अधिक परिणामकारक असतात.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.९६६४५५९७८०


अध्यात्मशास्त्रानुसार मांसाहार हे मानवाचे खाद्य नव्हे. मांसाहार भक्षणाने शरीरातील तमोगुण वाढतात. मांसाहार म्हणजे जीवाची हत्या असल्याने ते पापकर्म म्हणून गणले जाते. अंड्यांपासून जीवाची व्युत्पत्ती होत असल्याने अंडे खाऊन एका जिवाच्याच हत्येला आपण कारणीभूत ठरतो. सश्रद्ध मंडळी अन्नग्रहण करताना सर्वप्रथम डोळे मिटून आणि नमस्कार करून ते अन्न भगवंताच्या चरणी अर्पण करतात आणि त्याचा प्रसाद म्हणून स्वतः ते अन्न ग्रहण करतात. मांसाहार भगवंतालाच वर्ज्य असल्याने तो त्याला कसे अर्पण करणार, या भावामुळे अनेक जण मांसाहार ग्रहण करत नाहीत.

काही दिवसांपूर्वी कर्नाटकातील एका शाळेत एका शिक्षकाने एका ब्राह्मण विद्यार्थिनीला जबरदस्तीने अंडे खाऊ घातले होते, यावरून बराच वादंग माजला होता. भविष्यात महाराष्ट्रातही असा प्रकार घडल्यास त्याचे दायित्व कोण घेणार ? त्यामुळे शालेय पोषण आहारात अंड्यांपासून बनवलेल्या पदार्थांचा समावेश करण्याच्या निर्णयाचा राज्य सरकारने पुनर्विचार करावा !

# अध्यात्माचा विश्वचषक - संत राजिन्दर सिंह जी महाराज

**धावपटू ज्या प्रकारे विश्वचषकाच्या स्पर्धेची तयारी करतात त्यापासून ही एक बाब स्पष्ट होते की, कोणतेही ध्येय प्राप्त करण्यासाठी तीव्र इच्छाशक्ती, कठोर मेहनत आणि प्रबळ प्रेम भावनेची आवश्यकता असते. आपली तयारी करीत असताना त्यांना या खास गोष्टीवर लक्ष ठेवावे लागते की, त्यांना किती वाजता उठायचे आहे, केव्हा झोपायचे आहे, काय खायचे आहे, काय प्यायचे आहे, किती वेळ अभ्यासाला द्यायचा आहे किंवा कोणत्या गोष्टीतून त्यांना प्रेरणा मिळेल? ते आपल्या दिवसाचा प्रत्येक क्षण फार समजून-उमजून व्यतीत करून विश्वचषकाची तयारी करतात.**

विश्व भरातील सर्व लोकांना आश्चर्य वाटते की जेव्हा विश्वचषक किंवा ओलंपिक मध्ये विभिन्न खेळाच्या संघाच्या खेळाडूंना क्रिकेट, बास्केटबॉल, फुटबॉल, हॉकी इत्यादी खेळांमध्ये सर्वोत्कृष्ट खेळाडू होण्याकरिता सामना करताना पाहतो की, माणसांना असं वाटतं की माणसाला जे काही हवे असेल ते तो प्राप्त करू शकतो, केवळ या अटीवर की त्याने मनापासून मेहनत केली पाहिजे.



कोणत्याही खेळातील सर्वोत्कृष्ट खेळाडू होण्याकरिता त्या खेळाच्या प्रशिक्षित मार्गदर्शकाच्या देखरेखीखाली नियमितपणे अभ्यास करावा लागतो. ठीक अशाच प्रकारे आपल्याला अध्यात्मात उन्नती करायची असेल तर आपणासही त्या काळातील पूर्ण सद्गुरूंच्या मार्गदर्शनाखाली सदाचारी जीवन जगून नियमितपणे ध्यान-अभ्यासाकरिता वेळ दिला पाहिजे. जर असे आपण केले तर आपण निश्चितपणे मानवी जीवनाचे ध्येय जे 'आपण स्वतःला ओळखणे आणि प्रभूला प्राप्त करणे' याच जीवनात प्राप्त करू शकतो.


आपण इतिहासातील त्या महान विभूतींची प्रशंसा करतो, ज्यांनी आपल्या प्रार्थना आणि ध्यान-अभ्यासाद्वारे स्वतःला ओळखले आणि प्रभूला प्राप्त केले. ते असे करू शकले कारण की, जीवन आणि मृत्यू च्या रहस्याला ते सोडवू इच्छित होते आणि हेही जाणण्याची त्यांची इच्छा होती आपण इथे कशाला आलेलो आहोत? आणि आपण हे जीवन संपवल्यावर कुठे जातो? ते सर्व प्रभू प्राप्तीकरिता पूर्ण समर्पित होते.

जोपर्यंत ते आपल्या ध्येयापर्यंत पोहोचत नाहीत तोपर्यंत त्यांनी अनेक वर्षे रात्रंदिवस ध्यान अभ्यासासाठी वेळ व्यतीत केला. आपण सुद्धा अध्यात्मिक जागृती प्राप्त करू शकतो. प्रभूच्या ज्योती आणि श्रुतीचा अभ्यास किंवा शब्द-अभ्यासाचा महत्त्वपूर्ण लाभ असा होतो की, हा अत्यंत कमी अवधीत अध्यात्माचा विश्वचषक प्राप्त करून देतो. म्हणजेच आपल्या आत्म्याचे परमात्म्याशी आपण मिलन करू शकतो. नामस्मरण, ध्यान आणि आपल्या अंतरी गुंजणार्‍या या नादाला ऐकण्याच्या हा अभ्यास आपल्याला ध्यान केंद्रित करण्याचा साधा व सरळ मार्ग दाखवितो, जो आपणास लवकरात लवकर सफलता प्राप्त करून देतो.

या अभ्यासात आपण आपले लक्ष बाहेरून हटवून दोन डोळ्यांच्या भ्रुमध्यावर शिवनेत्रावर टिकवितो. हा अभ्यास आपल्या आधुनिक जीवनाला अनुकूल आहे आणि आपण याला अगदी सहजतेने घरी, कार्यस्थळी अथवा जिथे कुठे आपण जातो आणि राहतो तिथे करू शकतो. याकरिता आपण घरदार सोडून जंगलात, डोंगरावर अथवा गुहेमध्ये जाण्याची आवश्यकता नाही.

आपण आपल्या संसारिक जबाबदार्‍या पार पाडताना हा ध्यान-अभ्यास करू शकतो. सायन्स ऑफ स्पिरिच्युऍलिटी सकारात्मक अध्यात्मावर केंद्रित आहे. ज्यामध्ये आपण नैतिक जीवन जगत असताना अधिकाधिक वेळ ध्यान-अभ्यासासाठी देतो, यामुळे आपण शारीरिक, मानसिक अथवा अध्यात्मिकरित्या विकसित होऊ शकतो. जीवनातील सर्व क्षेत्रांमध्ये चांगल्या प्रकारे कार्य करू शकतो. जर आपण धावपटु सारखे जे खेळांमध्ये निपुणता प्राप्त करण्या करिता समर्पित होतात, त्याप्रमाणे आपण सुद्धा त्याच तीव्र इच्छेने आणि दृढतेने आत्म साक्षात्कार आणि परमात्मा साक्षात्काराचे आपले ध्येय प्राप्त करण्याकरिता समर्पित झालो तर, आपण निश्चितपणे एक दिवस आध्यात्मिकतेचा विश्वचषक अवश्य प्राप्त करू शकू.

## शब्दकोडे-२५९



**आडवे शब्द**

१. धंदा, उद्योग ५. खिशाला खार ९. दिवाळीतील बळीराजाचा दिवस ११. श्रीकृष्णाचे एक नाव १४. प्रत्येक वर्षी १६. हिंमत १८. निमित्त १९. लहान बाळ २०. शुभ्र, पांढरा २२. मातीच्या वासाचे २४. वरपांगी २५. अंतःकरण २६. अरण्य २८. न दबणारे, कडक २९. दुर्दशा ३०. कंबर ३१. अमृत ३४. समोरासमोरची चकमक ३५. वंदन ३६. नारळाचे झाड ३७. कल्पना मूर्त रूपात आणणारा ३८. उमर ४०. अनावश्यक, नको असता ४२. मयूर ४४. मोठा नगारा ४६. टोळीचा प्रमुख ४८. दुष्ट ४९. पालक पित्यावरून श्रीकृष्णाचे एक नाव ५०. सत्व ५२. तोफगाडी ५४. गणपतीची आई ५५. अर्धांगवायू ५७. लोकोत्तर पुरुष ५९. वाईट सवय ६०. च्या शिवाय ६२. धान्यघर ६५. शेराला कधीतरी भेटणारा ६६. तमाशातील सोंगाड्या ६७. तेज, कांती ६९. भुंगा, भ्रमर ७०. भारवाहक ७१. घाई, त्वरा ७३. जानकी ७४. देहाची खोळ ७६. कळलाव्या मुनी ७८. सत्तेचा खेळ ८०. शिवरायांच्या नंतर ही उपाधी द्यावी असा नेता अद्याप दुर्मिळच! ८१. जमीन ८२.जखमेवरील औषध ८३. केळ्याची गोड जात

**उभे शब्द**

२. वस्ती ३. जेव्हा ४. चाहूल, पावलांचा आवाज ६. राजाची कचेरी, राजसभा ७. अनेकांना उकडीचे प्रिय! ८. भीती ९. पदर १०. बोलणे, वाणी १२. संधी १३. उन्हाची तीव्रता १५. निर्मितीसाठी आवश्यक घटक १६. प्रवासात सांभाळा! १७. च्या सह २१. चटकन २३. धनुष्याच्या दोरीचा आवाज २५. कामदेव २७. अभिनेत्री २९. बेफाम ३२. धैर्य, साहस ३३. उगीच, अकारण ३४. तात्पर्य ३९. हद्द ४१. साठ मिनिटे ४२. किंमत ४३. पत्रातील वि.वि. ४४. अडत्या ४५. धनी ४७. उंबरठा ४८. छोटा दगड ५०. न्यूनता ५१. षट, अर्धा डझन ५३. समुद्राच्या लाटांचा आवाज ५४. हरिणाचे पिल्लू ५६. मार्गक्रमण ५८. नको असलेला ६१. बाई ६३. भटक्या, गोसावी ६४. बहुरूपी ६६. करून सवरून वेगळा राहणारा ६८. वेदना ७२. अंकुर ७४. भावकी ७५. हुक्की, लहर ७७. दीर्घ श्वास ७९. गोडी

### शब्दकोडे-२५८ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.सुदामा ६.आसपास ९.रास ११.दरसाली १३.वाट १४.राजधानी १६.नजरानजर १९.समा २०.नवीन २२.रसा २३.बजबजपुरी २६.रोज २७.फार २९.वल्लरी ३०.टर ३१.नख ३२.क्रय ३४.बखर ३६.बडबड ३८.जबरन ४०.हनुवटी ४२.भाकर ४४.सामान ४५.नहर ४६.चतकोर ४८.नकटी ५०.कळक ५२.साट ५४.रचना ५६.अफरातफर ५७.चाक ५८.भरत ५९.अवजड ६०.वणी ६१.शरद ६२.कीव ६३.स्तवन ६५.कलह ६७.परसदार ६९.पोकळ ७१.वरदान ७३.वारस ७४.मळा ७५.काक ७६.जन्म ७७.बोकड ७८.काळवीट ७९.वारसदार ८०.सावध ८१.केरळ

**उभे उत्तर**

१.सुदर्शन चक्र २.दार ३.मासा ४.आवरासावर ५.बळजबरी ६.आवा ७.सट ८.सरासरी ९.राधा १०.सनी डेज १२.लीन १५.जमा १७.जर १८.रज २१.नफा २४.बटबटीत २५.जरड २६.रोखठोक २८.रबर ३३.यजमान ३५.खनन ३७.बहार ३९.बनकर ४०.हरकत ४१.वचक ४२.भाग्य ४३.रपेट ४७.कोरफड ४९.टीचभर ५१.नतमस्तक ५२.सारवान ५३.अचानक ५५.नारद ५६.अजगर ५९.अवसर ६१.शहर ६२.कीरवा ६४.वळवळ ६६.लवकर ६८.दासबोध ६९.पोळा ७०.टकटक ७२.नजर ७४.मडके ७५.कावा ७८.काळ

## तेलंगणा, छत्तीसगडमध्ये सत्तांतर का?

वास्तविक पाहता त्यांनी या निवडणुकीसाठी खूप आधी ११५ उमेदवारांची घोषणा करून आघाडी घेतली होती; परंतु ही रणनीती फसली. बीआरएसच्या आमदारांवर मतदारही खूश नव्हते. अशा वेळी भाकरी फिरवावी लागते. भाजप ते बरोबर करतो. राव यांनी मात्र उमेदवारांच्या यादीत फारसा बदल केला नाही. परिणामी, बहुतेक जुने उमेदवार पराभूत झाले. बीआरएस प्रमुखांची हुकूमशाही वृत्ती मतदारांना आवडली नाही. काँग्रेसने त्याचा फायदा घेतला. बीआरएसचे कार्याध्यक्ष केटी रामाराव ऊर्फ केटीआर यांनी कबूल केले की पक्षाने उमेदवार बदलले असते तर ते आणखी जागा जिंकू शकले असते. सरकारने लोकांसाठी सुरू केलेल्या अनेकानेक कल्याणकारी योजनांमुळे आपण पुन्हा सत्तेत येऊ शकू, असा बीआरएसचा अंदाज होता. पेन्शनपासून गृहबांधणीपर्यंतच्या विविध योजनांमुळे मतदार आपल्याला मतदान करतील, हा त्यांचा कयास चुकला. काही योजनांचा तर विपरीत परिणाम दिसून आला. दलित बंधू योजनेचे लाभार्थी ज्या पद्धतीने निवडले गेले, त्यावर लोक खूश नव्हते. सलग दोन टर्म सत्तेत असलेल्या पक्षाविरोधात लाट येणे स्वाभाविक आहे. तेलंगणातही बीआरएस सरकारविरोधात सत्ताविरोधी लाट दिसून आली. तेलंगणा राज्याच्या निर्मितीमागे लोकांच्या आशा, गरजा आणि स्वप्ने पूर्ण करणे हा उद्देश होता. पाणी, आर्थिक सहाय्य, सरकारी खात्यात नोकरी अशा संधी उपलब्ध होतील, अशी आशा लोकांना होती; परंतु तसे झाले नाही. सरकारी खात्यांमधील रिक्त जागा भरण्यासाठी सरकारने केलेल्या किरकोळ प्रयत्नांमुळे राज्यातील तरुण नाखूश झाले. सरकारच्या विरोधात रोष होता. तेलंगणा राज्य लोकसेवा आयोगाने निवडणुकीच्या बारा महिने आधी रिक्त पदे भरण्यासाठी अनेक अधिसूचना जारी केल्या; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. गट-१ पदांसाठी परीक्षा दोनदा रद्द करण्यात आली. अनेक नोकर्‍यांसाठी परीक्षा घेण्यात आल्या; पण त्यांचे निकाल जाहीर झाले नाहीत. भाजपा आणि बीआरएसमध्ये घट्ट मैत्री असल्याचा समजही पसरला होता; मात्र नंतर या दोन पक्षांमध्ये काही मतभेद निर्माण झाले. राज्यात भाजपा प्रमुख विरोधी पक्षाच्या भूमिकेत दिसत होता.

राजकीय समीकरण बदलल्यानंतर 'ईडी'ने दिल्ली दारू घोटाळ्याप्रकरणी केसीआर यांच्या मुलीची चौकशी केली होती; पण कर्नाटकातील निवडणुकीच्या निकालानंतर तेलंगणातील राजकीय समीकरणे बदलली. बीआरएस आणि भाजपा एकत्र असल्याचा भास निर्माण झाला. तेलंगणातील मतदारांनी हे गांभीर्याने घेतले. केसीआर राज्याचे मुख्यमंत्री होते, तर त्यांचा मुलगा केटीआर आणि पुतणे टी. हरीश राव कॅबिनेट मंत्री होते. त्यांची मुलगी कविता तेलंगणा विधान परिषदेची सदस्य आहे. त्यांचे जवळचे सहकारी संसद सदस्य आहेत. या घराणेशाहीवर जोरदार हल्ला केला गेला. लोकांच्या या विचारसरणीचा फायदा काँग्रेसने घेतला. त्यातूनच स्वतःच्या चुकांमधून बीआरएस अडचणीमध्ये आला आणि काँग्रेसने संधी साधली.

**समाप्त:**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# फाळके स्मारक, वॉटर पार्क 'रामोजी फिल्म सिटी'च्या धर्तीवर विकसित करण्यासाठी मंत्री भुसेंचे मुख्यमंत्र्यांसह पर्यटनमंत्र्यांना साकडे

**नाशिक । प्रतिनिधी**

मनपा क्षेत्रातील चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके स्मारक व वॉटर पार्क रामोजी फिल्म सिटीच्या धर्तीवर विकसीत करणेकरीता निधी उपलब्ध होवून कार्यान्वित होण्याबाबत नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी काल पत्राद्वारे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांना पत्राद्वारे मागणी केली आहे. चित्रपटमहर्षी दादासाहेब फाळके यांच्या नावाने पांडव लेण्या पायथ्याशी सुरू करण्यात आलेल्या स्मारकाचा कायापालट होण्यास मोठी मदत होणार असून यामुळे नाशिकच्या वैभवात मोठी भर पडणार आहे. २३ वर्षांपूर्वी महापालिकेकडून दादासाहेब फाळके स्मारकाची निर्मिती करण्यात आली होती.

पत्राद्वारे केलेल्या मागणीत मंत्री भुसे म्हणाले की, नाशिक महापालिका क्षेत्रात मौजे पाथर्डी शिवारातील सर्वे नं.२८७ या महापालिकेच्या जागेवर पांडवलेणीच्या पायथ्याशी निसर्गरम्य अशा ठिकाणी महापालिकेने चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके स्मारक व वॉटर पार्क येथे रामोजी फिल्म सिटीच्या धर्तीवर विकसीत करणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

नाशिक शहरातील नागरिकांना, पर्यटकांना विविध सुविधा पुरविणे व पर्यटनास चालना देण्याच्या दृष्टीने चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके स्मारक व वॉटर पार्क येथे रामोजी फिल्म सिटीच्या धर्तीवर विकसीत करण्यासाठी भरीव निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी विनंती मंत्री भुसे यांनी पत्राद्वारे केली आहे.



नाशिक मनपा क्षेत्रात मौजे पाथर्डी शिवारातील सर्वे. नं.२८७ या जागेवर महापालिकेच्या मंजुर विकास आराखड्यानुसार रिक्रियेशन सेंटरचे आरक्षण आहे. सदर जागा विकसीत करण्यासाठी व तेथे चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके यांचे स्मारक होण्याच्या हेतुने जिल्हाधिकारी, नाशिक यांनी महाराष्ट्र शासनाची जमीन महापालिकेस ११ हेक्टर ७५ आर क्षेत्र हस्तांतरीत करण्यास मान्यता देणेत आली होती व त्याचा ताबा दि.९ एप्रिल १९९१ रोजी महापालिकेस शासनाकडून प्राप्त झाला. सदर मौजे पाथर्डी शिवारातील सर्वे. नं.२८७ जागेवर पांडवलेण्याच्या पायथ्याशी निसर्गरम्य अशा ठिकाणी महापालिकेने चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके स्मारकाचे बांधकाम करून ते नाशिकच्या नागरीकांसाठी पर्यटकांसाठी सन २००१ मध्ये खुले केले. त्याच जागेत नंतर वॉटर पार्क देखील सुरू करण्यात आलेले आहे व सुमारे चार एकर जागेवर बुध्द विहार विकसीत करण्यात आलेला आहे.

या ठिकाणी मनपा मार्फत उद्यान, संगीत कारंजा, ओपन थिएटर, संग्रहालय, जॉगींग ट्रैक इत्यादी विकसीत केले आहे. सद्यस्थितीत सदर स्मारकास अत्यल्प प्रतिसाद मिळत आहे. चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके स्मारक व वॉटर पार्क येथे रामोजी फिल्म सिटीच्या धर्तीवर नाशिक शहरातील नागरीकांना विविध सुविधा पुरविणे उदा. थिम पार्क करणे, सायन्स सेंटर उभारणे, वॉटर पार्क मधील नवीन उपकरणे बसविणे, अम्युझमेंट पार्क, ॲडव्हेंचर पार्क, फिल्म सिटी तयार करणे आदी प्रकारचे उपक्रम राबविल्यास या ठिकाणी नागरीकांचा प्रतिसाद वाढण्यास मोठी मदत होईल, पर्यटनास चालना मिळेल, चित्रपट निर्मिती क्षेत्राचा सुध्दा प्रतिसाद मिळू शकेल, नाशिकचा नावलौकीक वाढण्यास मदत होईल.

चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके स्मारक च वॉटर पार्क येथे रामोजी फिल्म सिटीच्या धर्तीवर विकास होण्यास नागरीकांचा प्रतिसाद वाढण्यास मोठी मदत होईल व पर्यटनास चालना मिळेल शहराच्या नावलौकीकात भर पडेल असे मत मंत्री दादाजी भुसे यांनी केले आहे. चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके स्मारक व वॉटर पार्क येथे रामोजी फिल्म सिटीच्या धर्तीवर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत विकसीत करणेकामी अथवा मनपा मार्फत विकसीत करण्यासाठी निधी उपलब्ध करण्यात यावा अशी विनंती मंत्री भुसे यांनी केली आहे.



# संतश्रेष्ठ संताजी महाराज यांना जयंतीनिमित्त भाजपाचे अभिवादन

**नाशिक । प्रतिनिधी**

भाजपा ओबीसी मोर्चा, नाशिक महानगर व प्रदेश तेली महासंघ यांच्या वतीने श्री संताजी महाराज यांची जयंती भाजपा वसंतस्मृती कार्यालयात अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव, आ.देवयानी फरांदे, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, नाशिक लोकसभा समन्वयक गिरीश पालवे, सरचिटणीस नाना शिलेदार, डॉ. शरद महाले, श्रीधर व्यवहारे, भानुदास चौधरी, नंदू नाना पवार, अविनाश खैरनार, राजेंद्र मोरे, उदय रत्नपारखी, विनायक कस्तुरे, राहुल गणोरे, बी.जी. चौधरी, आनंदा चौधरी, भिकन शिरसाट, अजय आगाव, उत्तम सोनवणे या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते श्री संताजी महाराज यांच्या प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर समाजातील विविध क्षेत्रात काम केलेल्या ज्येष्ठ व गुणवंत नागरिकांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आ.फरांदे यांनी समाजाला संतांच्या विचारांची गरज कशी आहे हे विस्तृत करून सांगितले. लक्ष्मण सावजी यांनी भारतीय संस्कृतीत संतांचे असलेले विचार हे सर्व जाती व धर्मांचे बंधनात न ठेवता समग्र मानवी जीवनासाठी किती गरजेचा आहे हे सांगितले. तसेच डॉ.शरद महाले, सदुभाऊ वालझाडे यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन कैलास कोरडे यांनी केले, प्रास्ताविक व स्वागत उदय रत्नपारखी यांनी केले, राजेंद्र मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला तर आभार प्रदर्शन नाना शिलेदार यांनी केले.

# राष्ट्रीय अजिंक्यपद खोखो स्पर्धेत शासकीय कन्या शाळेतील विद्यार्थिनींची निवड

**नाशिक । वार्ताहर**

केंद्र राष्ट्रीय अजिंक्यपद खोखो स्पर्धेत १४ वर्षांच्या आतील शालेय राष्ट्रीय स्पर्धा झारखंड येथे होणार असून या स्पर्धेत शासकीय कन्या शाळेतील विद्यार्थिनी निलम पांडुरंग मोहांडकर या विद्यार्थिनीची निवड झाली. तर कर्नाटक येथे होणाऱ्या १७ वर्ष आतील शालेय राष्ट्रीय स्पर्धेत शीतल धनराज गांगुर्डे या विद्यार्थिनीची निवड झाली आहे.

शासकीय कन्या शाळेतील विद्यार्थिनी या राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करत आहेत. यामध्ये नाशिक येथे पार पडलेल्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत शासकीय माध्यमिक कन्या विद्यालयातील विद्यार्थिनी सुषमा दिनकर चौधरी ही विद्यार्थिनीने महाराष्ट्र संघाचे कर्णधार पद भूषवले आहे. यात देशातील सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू म्हणून तिची निवड राष्ट्रीय संघात करण्यात आली. तसेच रोहिणी दत्तू भवर या विद्यार्थिनीने देखील महाराष्ट्र संघात उत्कृष्ट कामगिरी केली. नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी काल या विद्यार्थिनींची भेट घेऊन या विद्यार्थिनींचा सत्कार केला. यावेळी शिक्षणाधिकारी डॉ. नितीन बच्छाव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी, गट शिक्षणाधिकारी तथा मुख्याध्यापक डॉ. मिता चौधरी, शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका कविता साठे या उपस्थित होत्या. या विद्यार्थिनींचा नियमित सराव हा असोशिएशनच्या माध्यमातून होत असतो. त्याचबरोबर शासकीय माध्यमिक कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. पवार, उत्तम बारवकर, मनीषा वारडे, दिपाली अहिरे, जयश्री अहिरे, संगीता गवांदे, प्रकाश खरे आदी शिक्षकांचे विद्यार्थिनींना वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन मिळत असते.

## विदेशी दारू जप्त; एकाविरूद्ध गुन्हा

**शिंदखेडा ।** तालुक्यातील मुडावद गावात स्थानिक गुन्हे शाखा आणि नरडाणा पोलिसांच्या पथकाने छापा टाकत विदेशी दारूची चोरटी विक्री करणाऱ्या एकाला रंगेहाथ पकडले. भटू दत्तात्रय कोतकर असे संशयिताचे नाव आहे. भटू कोतकर याच्याकडून २७ हजार १९० रुपयांची विदेशी दारू जप्त केली. अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, पोलिस निरीक्षक सचिन बेंद्रे, प्रल्हाद वाघ, तुषार सूर्यवंशी व दरबारसिंग गिरासे यांच्या प्रथकाने ही कारवाई केली.

# औद्योगिक वसाहत परिसरात शांतता प्रस्थापित करण्यावर विशेष भर देणार : नवे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक

**नाशिक । प्रतिनिधी**

उद्योजक हे जॉब क्रियेटर आहेत. ते पुण्याचे काम करत आहेत. त्यामुळे औद्योगिक वसाहतींच्या परिसरात शांतता प्रस्थापित करण्यावर आपला विशेष भर राहील. सर्व यंत्रणांची समन्वय समिती पुन्हा स्थापन करण्यात येईल. समितीची दरमहा बैठक आयोजित करण्यात येईल, असे अभिवचन नाशिकचे नूतन पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी दिले.




आयमा आणि जीटीटीसीआय यांच्या वतीने आयमा सभागृहात आयोजित कार्यक्रमाचे वेळी प्रमुख पाहुणे म्हणून कर्णिक बोलत होते. प्रारंभी निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे यांनी अंबड आणि सातपूर परिसरात नांदत असलेल्या शांततेबद्दल माहिती दिली. या परिसरात युनियनचा वाद नाही, माथाडींना आम्ही शिरकाव करू दिला नाही असे त्यांनी निदर्शनास आणले. औद्योगिक वसाहतींमध्ये वाहतूक व्यवस्थापनाचा तसेच पार्किंगचा प्रश्न गंभीर असल्याचे बेळे म्हणाले. भुरट्या चोरांचा बंदोबस्त करावा असेही ते म्हणाले. या सर्व प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष दिले जाईल असे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी नमूद केले. चुंचाळे पोलीस चौकीचे पोलीस स्टेशनमध्ये रूपांतर करावे अशी मागणी आयमा अध्यक्ष निखिल पांचाळ यांनी यावेळी केली. यावेळी पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर देशमुख, पोलीस निरीक्षक मनोहर कारंडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी आयमा अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांतर्फे नूतन आयुक्तांचा सत्कार करण्यात आला.

# कॅमेरामध्ये वंचितचा आवाज बनण्याची मोठी ताकद

## पद्मश्री सुधारक ओळवे यांचे प्रतिपादन

**नाशिक । प्रतिनिधी**

कॅमेरा संवादाचे प्रभावी माध्यम असून समाजातील दुर्लक्षित आणि वंचितांचा आवाज बनण्याची मोठी ताकद त्यामध्ये आहे. मात्र ही ताकद ओळख त्याचा योग्य वापर करण्याची गरज असल्याचे मत पद्मश्री सुधारक ओळवे माहितीपट छायाचित्रकार, मुंबई यांनी व्यक्त केले आहे. कुसुमाग्रज स्मारकात अभिव्यक्ती मिडीया फॉर डेव्हलपमेंट आयोजित १० व्या अंकुर फिल्म फेस्टिव्हलच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.




समाजातील नवोदित कलाकारांना, वंचित समूहांतील घटकांना आपले जगणे मांडण्यासाठी संधी मिळावी या उद्देशाने दरवर्षी अंकुर फेस्टीवल आयोजित केला जातो. यंदाही तीन दिवसाचा अंकुर फेस्टीवल आयोजित करण्यात आला होता. यामध्ये समारोपाच्या सत्रात ओळवे आणि निर्माण चौधरी फिल्म निर्माते, मुंबई यांनी कॅमेरा तंत्र आणि दृश्य कथन करणारे बदलाचे शिल्पकार या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी छायाचित्रांची ताकद विशद करणारे वेगवेगळे फोटो दाखवत कॅमेरा आणि त्याची हाताळणी यावर माहिती दिली. तर निर्माण चौधरी यांनी फोटो काढताना घटनास्थळी असलेली परिस्थिती कशी हाताळावी याबाबत सांगितले.

# शिवसेना महिला आघाडीत नाशिकमधील महिलांचा, बचत गट सदस्य, अंगणवाडी सेविकांचा प्रवेश

**नाशिक । प्रतिनिधी**

शिवसेना महिला आघाडी नाशिक लोकसभा संपर्क प्रमुख पूजा वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना नाशिक महानगर सह संपर्क प्रमुख सुवर्णा मटाले, महानगर संघटक अस्मिता देशमाने यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना नाशिक महानगरातील पंचवटी, अमृतधाम, सिडको, सातपूर, जेलरोड, नाशिकरोड परिसरातील शिवसेनेत प्रवेश केला. या प्रसंगी महिला आघाडी जिल्हा समन्वयक श्यामला दिक्षित, शोभा गटकळ, ज्योती फड, सीमा सिंघानिया, कावेरी आत्रे, डॉ.वृषाली व्यवहारे, अर्चना मगर, मंजुषा पवार, किर्ती ठाकुर, रंजना सायखिंडिकर, अनिता पाटील, सुनिता जाधव, माजी नगरसेविका संगिता जाधव, हर्षदा गायकर, मंदाकिनी जाधव, वैशाली मंडलीक, मोनिका मुथा, भारती धात्रक, आशा पाटील,अनिता भुसे




आदी उपस्थित होत्या.

आगामी लोकसभा, विधानसभा, महापालिका निवडणुकांच्या संदर्भात शिवसेना महिला आघाडी पदाधिकारी, महिला नगरसेविका, अंगीकृत महिला संघटना पदाधिकारी यांची महत्त्वाची बैठक शिवसेना मध्यवर्ती कार्यालय नाशिक शहर - जिल्हा येथे संपन्न झाली. शिवसेना नाशिक महानगर महिला आघाडीच्या वतीने महिला आघाडी लोकसभा संपर्क प्रमुख पुजा वाघ यांचा सत्कार करण्यात आला.

शिवसेना नाशिक महानगर महिला आघाडीच्या मंजुषा पवार यांच्या नेतृत्वखाली जेलरोड व नाशिकरोडच्या महिलांनी शिवसेनेत प्रवेश केला. ज्योतीताई फड यांच्या नेतृत्वखाली स्वयम श्रमसाफल्य बचत गट, पवननगर येथील महिलांनी प्रवेश केला. मोनिका मुथा यांच्या नेतृत्वाखाली सिडको येथील महिलांनी प्रवेश केला. शिव आंगणवाडी जिल्हाप्रमुख कावेरी आत्रे यांच्या नेतृत्वखाली आंगणवाडी सेविकांनी शिवसेनेत प्रवेश केला. सरला चव्हाण व सुलोचना मोहिते यांच्या नेतृत्वाखाली बचत गटाच्या महिलांनी प्रवेश केला.

---

ॲड. योगेश एम.चितळकर
नि. न. ६

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे. ७वे सह दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्थर यांचे कोर्टात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. १४१७/२०२३**

१) श्री. संजय मुरलीधर थोरात
२) श्रीमती. रत्नाबाई कचरू हाके
३) सौ. साधना पांडुरंग सुर्यवंशी ... **अर्जदार**
**।। आणि ।।**
कै. चिंधाबाई उर्फ शेवंताबाई मुरलीधर थोरात ... **मयत**

ज्या अर्थी अर्जदार यांनी वर नमुद मयतांचे कायेदशिर वारस या नावाने शासकीय, निमशासकीय, तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांचे कडील मयताच्या वारसासंबंधीच्या आवश्यक बाबींच्या पुर्ततेसाठी अर्जदारांचे नावे हेअरशीप सर्टिफिकेट मिळावे म्हणुन अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी वर नमुद केलेल्यनुसार मयतांच्या वारसाबाबत हेअरशिप सर्टिफिकेट अर्जदारांचे नावे देण्यास कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी दि. २४/०१/२०२४ रोजी १० वाजता वरील निर्दिष्ट केलेल्या कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहुन मांडाव्यात अन्यथा यांच्या मागणीप्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट देण्याबाबत योग्य तो आदेश करण्यात येईल.

आदेशावरुन,

शिक्का

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायाधीश क.स्तर धुळे** — **अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश क.स्तर धुळे**

---

ॲडव्होकेट एच ई शेख, धुळे
नि. न. ६

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज. क्र.१४१५/२०२३**

१. मुरलीधर श्रीराम शिरोडे
२. सतिष मुरलीधर शिरोडे
३. संगिता मुरलीधर शिरोडे, ... **अर्जदार**
**।। विरुध्द ।।**
**कोणीही नाही** ... **जाबदेणार**
**आणि**
१. मालती मुरलीधर शिरोडे, (मयत) ... **सा. वाला**

ज्याअर्थी दिनांक ०६/१२/२३ रोजी सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार नं. १ ते ३ हे मयत मालती मुरलीधर शिरोडे यांचे कायदेशीर वारस आहेत. त्या संदर्भात वारस दाखला (लिगल हेअरशीप सर्टीफीकेट) मिळावा म्हणुन सदरचा अर्ज धुळे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकज चालविणेकरीता चौकशी तारीख २९/०१/२४ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारसांना व इतर संबंधितांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, याबाबत कोणास काही वाद हरकत असल्याने धुळे येथील मे. ५ वे दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारेखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित न झाल्यास सदर कामी कोणाचीही काहीही हकरत नाही असे गृहीत धरण्यात येवुन सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.
धुळे
दिनांक : ०८/१२/२३ आदेशावरुन,

शिक्का

**कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायाधीश, व.स्तर धुळे** — **अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश, व.स्तर धुळे**

---

ॲड. एम. व्ही. घरटे
नि. न. ६

**धुळे येथिल मे. सह दिवाणी न्यायाधिश सो., (क. स्त.) यांचे कोर्टात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. १४१९/२०२३**

१. श्रीमती विमलबाई पंडीत वाणी उ.व. - ७८, धंदा गृहीणी,
रा. ०१, इंदासिनी नगर, राजीव गांधी शाळेजवळ, देवपुर, धुळे.
२. श्री. प्रमोद पंडीत शिरोडकर उ.व. -५१, धंदा-खा. नोकरी,
रा.प्लॉट नं. १२६, चाणक्या नगर, इति अंबड लिंक रोड, कामटवाडा, नाशिक.
३. सौ. भारती गोरख दशपुते उ.व.- ४०, धंदा- गृहीणी,
रा. इंदिरा नगर, पिंपळनेर, ता. साक्री, जि. धुळे. ... **अर्जदार**
**।। विरुध्द ।।**
कै. पंडीत गोपाळ वाणी
मयताचा पत्ता - ०२, इंदासिनी नगर, राजीव गांधी शाळेजवळ, देवपुर, धुळे.
मृत्यु दिनांक : २९/०७/२०२१ ... **सा. वाला**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

१. अर्जदार क्र. १ ते ३ यांनी ते मयत कै. पंडीत गोपाळ वाणी यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवुन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाकामी कोणाचीही काही एक हरकत असल्यास त्यांनी दिनांक : १९/०१/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता आपण स्वतः अथवा आपल्या वकीलांमार्फेत हजर राहुन लेखी हरकत नोंदवावी.

३. उक्त दिवशी व वेळी कोणी हजर न झाल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन पुढील आदेश पारीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काही एक तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस न्यायालयाचे शिक्यानिशी व माझे सहीनिशी आज दि.०८/१२/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.
धुळे
दिनांक : ०८/१२/२०२३ आदेशावरुन,

शिक्का

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय (व.स्त) धुळे.** — **अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व.स्त) धुळे.**

---

अनिल के गवळी
नि. न. ६

## जाहीर नोटीस

**धुळे येथील म.दिवाणी न्यायाधीश (क) स्तर सो धुळे यांचे कोर्टात.**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. १४०७/२०२३**

सुरेखा संजय पाटील ... **अर्जदार**
**।। विरुध्द ।।**
**कोणीही नाही** .... **जाबदेणार**
कै.संजय बाबुराव पाटील ... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. धुळे यांचे कडे दि. ०४/१२/२०२३ रोजी कि.दि.अर्ज नं. १४०७/२०२३ चा अर्ज कै. संजय बाबुराव पाटील रा. नरसिंह चौक, मु.पो कापडणे ता.जि. धुळे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेसाठी व ते कै. संजय बाबुराव पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकामी सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि. १७/०१/२०२४. ही निश्चीत केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वैगेरे संबंधीताना कळविण्यात येते की, सदर अर्जासंबंधी कुणास काहीही हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. ५ धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस व तत्पूवी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाची काहीही हरकत आली नाही, तर सदर अर्जास कोणाची काहीही एक हरकत नाही असे समजून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची/ हरकतीची कोणतीही दाखल घेतली जाणार नाही.

सदरची जाहीर नोटीस मे. न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली असे.
धुळे
दि. ०८/१२/२०२३ आदेशावरुन,

शिक्का

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायाधीश क. स्तर धुळे** — **अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश क. स्तर धुळे**

---

**प्रोसेस जमा** — **ॲड. एम. सी. बेडसे.**

## जाहीर नोटीस

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं. ४१३/२०२३**

१) श्री. सुरेश रघुनाथ देवरे (माळी), वगैरे ५ ... **अर्जदार**
**।। विरुध्द ।।**
**कोणीही नाही** .... **जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन 'ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय क स्तर साक्री येथे दि. ६/१२/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार नं. १ ते ५ यांची आई नामे कै. व्दारकाबाई रघुनाथ देवरे (माळी) ह्यांचे दि. ०९/०१/२०२३ रोजी मौजे खुडाणे ता. साक्री जि. धुळे येथे निधन झालेले आहे. तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

| वारसांची नावे | नाते / संबंध |
| --- | --- |
| १) श्री. सुरेश रघुनाथ देवरे (माळी) | -मुलगा |
| २) श्री. ईश्वर रघुनाथ देवरे (माळी) | -मुलगा |
| ३) श्री. राजेंद्र रघुनाथ देवरे (माळी) | -मुलगा |
| ४) सौ. अंजनाबेन (अंजनाबाई) संतोषभाई (संतोष महाजन (माळी) | -मुलगी |
| ५) सौ. सिंधुबाई (सुमित्रांबेन) विश्वनाथ महाजन (माळी) | -मुलगी |

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खात निहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसां व्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालयात दि. २२/१/२०२४ रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहि शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

शिक्का

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय साक्री** — **सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय साक्री**



# आदिवासी शेतकरी-कष्टकरी धडकणार मंत्रालयावर

## १७ दिवसात ४३२ किलोमीटरची करणार शेतकरी पायपीट











धुळे । आदिवासी शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसह जंगलग्रस्तांचे प्रश्न सोडवावेत, यासाठी सत्यशोधक शेतकरी सभा आणि सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेतर्फे नंदुरबारहून निघालेला पायी बिर्हाड महामोर्चा काल धुळ्यात आला. आता मुंबईकडे कूच करणार आहे. मोर्चा १७ दिवस ४३२ किलोमीटर पायपीट करीत मंत्रालयावर धडकणार आहे. मोर्चा नंदुरबार, साक्रीमार्गे धुळे, मालेगाव, नाशिक, मुंबई असा जाणार असून २३ डिसेंबर रोजी मुंबईत पोहोचेल. सरकारने योग्य निर्णय न घेता महामोर्चा अडवल्यास त्याच ठिकाणी जेलभरो सत्याग्रह करण्यात येईल.असा इशारा मोर्चेकऱ्यांनी दिला आहे. मोर्चाला रामसिंग गावीत, करणसिंग कोकणी, किशोर ढमाले, सुभाष काकुस्ते हे मार्गदर्शन करत आहेत. नंदुरबारहून निघालेला मोर्चा आणि साक्री, (जि.धुळे) येथून निघालेला मोर्चा ११ डिसेंबर रोजी धुळ्यात जेलरोडवर एकत्र येतील. मालेगाव येथे १३ डिसेंबर रोजी, १७ डिसेंबर रोजी नाशिक येथील आदिवासी विकास भवनाजवळ मोर्चा पोहचणार आहे. त्या ठिकाणी जाहीर सभा होईल. सभेला महाराष्ट्रातील विविध शेतकरी संघटन आणि डाव्या व आंबेडकरवादी पक्षांचे नेते मार्गदर्शन करतील.अशी माहिती दिलीप गावित, मन्साराम पवार, विक्रम गावित यांनी दिली आहे.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# आर्वी येथे विज वितरण कंपनीचा भोंगळ कारभार

## ग्रामस्थांनी दिला आंदोलनाचा इशारा














धुळे।
तालुक्यातील आर्वी येथे विज वितरण कंपनीचा भोंगळ कारभाराविरोधात जि.प.सदस्य किशोर आह्लोर,पं.स.सदस्य जिभाऊ शेंनगे यांच्यासह गावकऱ्यांनी अभियंता दिनेश ठाकूर यांच्यासह कर्मचाऱ्यांना सोबत घेवून आर्वी गटात डीपी परिसरात पाहणी केली. गेल्या आठ दिवसापासून आर्वी गटातील पुरमेपाडा येथील चुडामनगर या ठिकाणी ग्रामस्थसह शेतकऱ्यांना पाणी नसल्याने संताप व्यक्त केला. अभियंता दिनेश ठाकूर यांना घेराव घालून स्वतः गावात आणले व गावाची परिस्थिती दाखवली. त्यात डीपीची वायर शॉर्ट झालेले डीपीला करंट लागत आहे. परिस्थितीत सुधारणा व्हावी. अन्यथा जन आंदोलन छेडू असा इशारा जिल्हा परिषद सदस्य किशोर आह्लोर, पंचायत समिती सदस्य जिभाऊ शेंडगे, पुरमेपाडा येथील सतिष जाधव, नाना खैरनार, सुनील सोनार, ईश्वर साळवे, माधव जाधव,जितेंद्र जाधव, कैलास मोरे, आधार मोरे,बळीराम सोनवणे, दादाभाऊ सोनवणे, लक्ष्मण सोनवणे,शिवदास सोनवणे, मनोज जाधव, धर्मा सोनवणे, राजेंद्र जाधव,रावसाहेब जाधव यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ